**शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या शिक्षण संस्थांना राज्य पुरस्कार शिफारशीसाठी खालील मार्गदर्शक सूचना व निकष :- 2010-11**

***अ) सर्वसाधारण सूचना :-***

१. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षण देणा-या संस्थांचाच फक्त विचार करण्यात यावा.

२. सोबत जोडलेल्या विहित प्रपत्र अ, ब नुसार माहिती पाठवावी.

३. नमुना प्रपत्र अ, ब हे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेमार्फत संस्थेला उपलब्ध करुन देण्यात यावे.

४. प्रपत्र अ मधील भाग-२ मध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अभिप्राय द्यावयाचे आहेत व भाग-३ मध्ये अभिप्राय सर्व सदस्यांनी स्वाक्षरी (नावासह) करावयाची आहे. प्रपत्र ब मधील माहिती तपासून ती सत्य असल्याची खात्री करुन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या स्वाक्षरी (शिक्क्यासह) सादर करावयाची आहे. परिपूर्ण प्रस्ताव ०१ प्रतीत पाठवावा. अशासकीय सदस्यांची नियुक्ती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी करावयाची आहे.

५. विभागीय निवड समितीची रचना पुढील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १. | अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ. | अध्यक्ष |
| २. | उप/सहाय्यक धर्मादाय आयुक्त | सदस्य |
| ३. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (स्थानिक) | शासकीय सदस्य |
| ४. | विभागातील प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त राष्ट्रीय/राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक | अशासकीय सदस्य |
| ५. | विभागातील माध्यमिक शाळेतील सेवानिवृत्त राष्ट्रीय/राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक | अशासकीय सदस्य |
| ६. | विभागातील ज्याचा कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाशी संबंध नाही असा एक शिक्षण तज्ज्ञ | अशासकीय सदस्य |
| ७. | विभागीय शिक्षण उपसंचालक | सदस्य सचिव |

शैक्षणिक संस्थांना या योजनेविषयी माहिती होण्यासाठी योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

६. राज्य निवड समिती प्रत्येक माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ क्षेत्रामधून उत्कृष्ट काम करणा-या एका संस्थेची विहित निकषानुसार व गुणवत्तेनुसार निवड करील. गुणवत्ता व निकषानुसार पात्र संस्था उपलब्ध न झाल्यास त्या विभागासाठी पुरस्कार जाहीर केला जाणार नाही.

राज्य पुरस्काराची रक्कम रुपये एक लक्ष असेल. प्रशस्तीपत्र देऊन संस्थेचा सन्मान राज्य शिक्षक पुरस्कार वितरण समारंभाच्या वेळी केला जाईल.

७. संस्थानी विहित प्रपत्र व इतर पूरक माहितीच्या आधारे ( A 4) पेपर आकारामध्ये स्पायरल बायडिंग करुन प्रस्ताव ०१ प्रतीत सादर करावा. (संस्थेस प्राप्त पुरस्कार, प्रमाणपत्र व प्रकाशित साहित्य तसेच उपक्रमावरील महत्वाचे रंगीत फोटोही सोबत जोडावेत.)

८. विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रस्तावाची एक प्रत आपल्या कार्यालयात जतन करावी. पाहिजे तेव्हा ती उपलब्ध करुन देण्यात यावी.

९. संस्थेच्या शाळांच्या इमारतीचे फोटोग्राफ प्रस्तावाच्या अखेरीस जोडावेत. तसेच शाळेतील भौतिक सुविधा (उदा.पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, विज्ञान व संगणक प्रयोगशाळा इ.) यांचाही फोटोग्राफमध्ये समावेश असावा.

१०. संस्थेने शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी कोणकोणते प्रयत्न केले याचा थोडक्यात गोषवारा प्रस्तावात असावा.

११. संस्था आपल्या निधीतून गरीब व दुर्बल गटाच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांचा दर्जा उंचाविण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांचा थोडक्यात गोषवारा प्रस्तावात असावा.

१२. संस्थेचे मागील तीन वर्षाचे आर्थिक लेखे अद्ययावत आहेत असे नोंदणीकृत चाटर्ड अकाउंटचे प्रमाणपत्र असावे. (पूर्ण लेखे देण्याची आवश्यकता नाही.)

## *ब) संस्था निवडी संबंधी निकष :-*

१. संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये पंजीकृत असावी. संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा किमान ०५ शाळा असाव्यात. **तथापि ५० वर्षापेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या संस्थांच्या बाबतीत ०५ शाळांची अट लागू राहणार नाही.**

२. संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात कमीत कमी ०७ वर्षे उल्लेखनीय कार्य केलेले असावे.

३. संस्था, कोणत्याही जाती/धर्माची प्रसार व पुरस्कार करणारी नसावी. निवड करावयाच्या संस्थांबाबत **जिल्हाधिकारी यांचे या संदर्भातील प्रमाणपत्र आवश्यक राहील.**

४. संस्था संचलित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये इ.मध्ये शासनाने/मंडळाने विहीत केलेल्या किमान भौतिक व इतर सुविधा असाव्यात.

५. संस्था संचलित शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व विश्वासार्ह असावी. संस्थेच्या प्रवेशाकरिता प्रवेशाच्यावेळी किंवा नंतर देणग्या घेण्याबाबत तक्रारी नसाव्यात.

६. संस्थेच्या व्यवस्थापनाबाबत, आर्थिक गैरव्यवहाराच्या/सदस्यांच्या गैरवर्तणुकीच्या किंवा विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीबाबत तक्रारी नसाव्यात. शाळेतील कर्मचा-यांबाबत/संस्थेच्या विश्वस्तांबाबत कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल झालेले नाहीत असे **प्रमाणपत्र** संबंधित संस्थेने देणे बंधनकारक राहील.

७. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शिष्यवृत्ती परीक्षा, राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, विज्ञान प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा, कला, संगीत इ. क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे प्राविण्य यासाठी संस्था प्रयत्न करणारी असावी.

८. संस्था संचलित माध्यमिक शाळांचा, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षांच्या गेल्या ०३ वर्षातील निकाल शहरी व ग्रामीण भागात विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकालापेक्षा कमी नसावा.

९. **संस्थेच्या निधीमधून शिक्षकांसाठी** दुर्बल व गरीब घटकातील विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम किंवा योजना कार्यान्वित केलेली असावी. विशेषतः अभ्यासात कमकुवत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न आणि सर्वसामान्य समुपदेशन करणारी सुपरिचित संस्था असावी.

१०. संस्थेच्या व्यवस्थापनात स्थैर्य असावे. अंतर्गत वाद नसावेत. (विहित कालावधी पूर्ण करणारे व्यवस्थापन मंडळ असावे.) याबाबत शिक्षण विभागाकडे किंवा धर्मादाय आयुक्तांकडे तक्रारी दाखल झालेल्या नसाव्यात. तसे प्रमाणपत्र संस्थेने जोडावे.

११. संस्थेचे आर्थिक लेखे अद्ययावत असावेत.

१२. संस्थेची अनाधिकृत शाळा सुरु नसावी, तसेच गेल्या ०३ वर्षात शून्य टक्के निकाल लागणारी एकही माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा नसावी. त्याचप्रमाणे मागील ०३ वर्षात कोणत्याही शाळेची मान्यता काढलेली नसावी.

१३. संस्थेस राज्य पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर त्या संस्थेचा पुढील १० वर्षे पुरस्कारासाठी पुन्हा विचार केला जाणार नाही.

१४. **संस्थेने शासनाच्या प्रचलित नियमानुसार आरक्षण भरलेले असणे आवश्यक राहील.** अन्यथा संस्था अपात्र ठरविण्यात येईल.

वरील प्रमाणे १ ते १४ निकष पूर्ण करीत आहे किंवा नाही याची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी काटेकोरपणे पहाणी करुन व माहिती घेऊन नंतरच आपले वस्तुनिष्ठ व स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्यात यावेत. माहितीत असत्यता आढळल्यास, त्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना जबाबदार धरण्यात येईल.

***क) विभागीय निवड समितीने प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे***

| | | |
|---|---|---|
| १. | विहित नमुन्यातील प्रस्ताव | ०१ प्रतीत |
| २. | विभागीय निवड समिती बैठक इतिवृत्त | ०२ प्रतीत |
| ३. | एकूण प्राप्त प्रस्तावांची यादी | ०२ प्रतीत |
| ४. | शिफारस केलेले व नाकारलेले प्रस्ताव, कारणमिमांसेसह | ०२ प्रतीत |
| ५. | गुणानुक्रमे शिफारस केलेल्या संस्थांची यादी. | ०२ प्रतीत |

## शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या शैक्षणिक संस्थांना पुरस्कार योजना.

### प्रपत्र - अ
भाग - १

१) संस्थेचे नांव, नोंदणीकृत पत्ता व फोन नंबर :-

२) संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक :-
(नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडावे.)

३) संस्थेचे स्थापना वर्ष :-

४) संस्थेची पहिली शाळा/शाखा सुरु झाल्याचे वर्ष :-

५) संस्थेच्या अध्यक्ष व सचिवाचे नांव व पत्ता फोन नं. :- १) ----------------------------------------
----------------------------------------
:- २) ----------------------------------------
----------------------------------------

(अन्य पदाधिका-यांची यादी सोबत जोडावी.)

६) संस्था चालवित असलेल्या शाळा/महाविद्यालयांची संख्या, विद्यार्थी संख्या व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी संख्या. :-
(सदर माहिती सोबतच्या तक्त्यात द्यावी.)

७) संस्थेच्या मागील तीन वर्षाचा एस.एस.सी. परिक्षेचा निकाल. (टिप - संस्थेचा निकाल ठरविताना संस्थेच्या सर्व शाळांमधून परीक्षेला फॉर्म भरलेले विद्यार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी यांच्या संख्या विचारात घ्यावी) :-

| वर्ष | बोर्डाचा निकाल % | संस्थेचा निकाल % | |
|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी |
| २००८-०९ | | | |
| २००९-१० | | | |
| २०१०-११ | | | |

८) संस्थेचा मागील तीन वर्षाचा एच.एस.सी. परीक्षेचा निकाल (टिप - वरील क्र. ७ प्रमाणेच) :-

| वर्ष | बोर्डाचा निकाल % | संस्थेचा निकाल % | |
|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी |
| २००८-०९ | | | |
| २००९-१० | | | |
| २०१०-११ | | | |

९) संस्थेमध्ये संगणक सुविधा उपलब्ध असलेल्या शाळांची संख्या व त्यामधील एकूण संगणक संख्या. :-

शाळा :-

एकूण संगणक :-

१०) संस्था अल्पसंख्याक आहे काय? असल्यास प्रमाणपत्र जोडावे. :-

११) संस्था चालवित असलेल्या शाळा/महाविद्यालयामध्ये प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व विश्वासार्ह आहे काय? :-

१२) संस्था आदिवासी/डोंगराळ/दुर्गम भागात शाळा/महाविद्यालये चालविते काय? असल्यास किती?

१३) संस्था जाती, धर्माचा प्रसार व पुरस्कार करते काय? (जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडावे.) :-

१४) संस्थेच्या शाळा/महाविद्यालयांमध्ये शासनाने विहित केलेल्या किमान भौतिक व इतर सुविधा आहेत काय? (शाळानिहाय माहिती द्यावी.) :-

१५) प्रवेशाकरिता किंवा इतर वेळी संस्था/शाळा देणग्या घेत काय?

१६) संस्थेच्या व्यवस्थापनाबद्दल आर्थिक गैरव्यवहाराच्या किंवा सदस्याच्या गैरवर्तणुकीबाबत तक्रारी आहेत काय? (संस्था प्रमाणपत्र जोडावे.) :-

१७) संस्थेच्या व्यवस्थापनाबद्दल न्यायालय/धर्मादाय आयुक्त यांचेकडे तक्रारी दाखल झाल्या आहेत काय? (संस्था प्रमाणपत्र जोडावे.) :-

१८) संस्था विकास निधी गोळा करते काय? सदर निधी कशा पध्दतीने गोळा केला जातो. (तपशील द्यावा) :-

१९) संस्थेची आर्थिक स्थिती सुस्थितीत आहे काय? (मागील तीन वर्षाचे लेखा परीक्षण नोंदणीकृत चार्टर्ड अकौंटंटचे प्रमाणपत्र जोडावे.) :-

२०) संस्था अनधिकृत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय चालविते काय? असल्यास तपशील द्यावा. :-

२१) मागील तीन वर्षात संस्था संचलित शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांचे निकाल शुन्य टक्के आहेत काय? असल्यास शाळेचे नांव,वर्ष इ. तपशील द्यावा. :-

२२) मागील तीन वर्षात संस्था संचलित शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांची मान्यता काढली आहे काय? असल्यास शाळेचे नांव, वर्ष इ. तपशील द्यावा. :-

२३) संस्था शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी कोणते विविध उपक्रम/योजना राबविते याचा थोडक्यात माहिती. (लाभार्थी व खर्चासह मागील तीन वर्षाचा तपशील द्यावा.) :-

२४) संस्था शैक्षणिक उपक्रमाबरोबर अन्य सामाजिक तसेच क्रीडा, कला, संगीत इ. विषयक उपक्रम राबविते काय? असल्यास त्याचा तपशील द्यावा. :-

२५) संस्था विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह चालविते काय? असल्यास किती ठिकाणी? (लाभार्थी व त्यांचा तपशील द्यावा.) :-

२६) संस्थेच्या किती शाळा/महाविद्यालये यांच्या इमारती :-
संस्थेच्या मालकीच्या आहेत?

२७) संस्थेला उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार/पारितोषिक :-
मिळाले असल्यास त्याचा तपशील द्यावा.

२८) संस्थेने/शाळेने प्रचलित नियमांनुसार आरक्षण :-
पूर्णपणे भरलेले आहे काय? (तपशील द्यावा व
संस्था प्रमाणपत्र जोडावे.)

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त दिलेली सर्व माहिती बरोबर व सत्य आहे. माहिती चुकीची अथवा खोटी असल्यास संस्था पुरस्कारासाठी अपात्र ठरेल किंवा जाहीर झालेल्या पुरस्कार रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

सचिव (शिक्क्यासह स्वाक्षरी)

दिनांक :- / /२०

पूर्ण नांव :-

## प्रपत्र अ भाग १ मधील अ.क्र. ०६ साठी सहपत्र.

### संस्था चालवित असलेल्या शाळा/महाविद्यालयांची संख्या/विद्यार्थी संख्या व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी संख्या दर्शविणारा तक्ता.

| अ. क्र. | शाखा | शाळांची संख्या | | | | विद्यार्थी संख्या | कर्मचारी संख्या | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | एकूण | | शिक्षक | शिक्षकेतर तृतीयश्रेणी | शिक्षकेतर चतुर्थश्रेणी | एकूण | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| १. | पूर्व प्राथमिक | | | | | | | | | | |
| २. | प्राथमिक | | | | | | | | | | |
| ३. | माध्यमिक | | | | | | | | | | |
| ४. | उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालये | | | | | | | | | | |
| ५. | वरिष्ठ महाविद्यालये (कला/वाणिज्य/विज्ञान) | | | | | | | | | | |
| ६. | अध्यापक विद्यालये (डी.एड.) | | | | | | | | | | |
| ७. | अध्यापक महाविद्यालये (बी.एड./बी.पी.एड.) | | | | | | | | | | |
| ८. | तंत्रनिकेतन/फार्मसी (पदविका) | | | | | | | | | | |
| ९. | अभियांत्रिकी महाविद्यालये | | | | | | | | | | |
| १०. | वैद्यकीय महाविद्यालय (फार्मसीसह) | | | | | | | | | | |
| ११. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) | | | | | | | | | | |
| १२. | व्यवस्थापन शिक्षण संस्था | | | | | | | | | | |
| १३. | इतर | | | | | | | | | | |
| १४. | एकूण | | | | | | | | | | |

दिनांक :- / /२०

संस्था सचिव
पूर्ण नांव,
शिक्का व स्वाक्षरी

## शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या शिक्षण संस्थांना पुरस्कार

### प्रपत्र - ब

विभागाचे नांव :-

१. संस्थेचे नांव व पत्ता :-

२. संस्था नोंदणी प्रमाणपत्र व क्रमांक :-

३. संस्था स्थापना वर्ष
कार्यरत वर्षे

४. संस्था अध्यक्ष (नांव व पत्ता) :- १) ------------------------------------------
------------------------------------------
सचिव २) ------------------------------------------
------------------------------------------

५. संस्थेच्या शाळांची संख्या :-

१) प्राथमिक :- ----------
२) माध्यमिक व उच्च माध्यमिक :- ----------

६. विद्यार्थी संख्या (स्तरनिहाय) :-

| | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| १) प्राथमिक : | | | |
| २) माध्यमिक : | | | |
| ३) उच्च माध्यमिक : | | | |
| ४) इतर शाखा : | | | |

७. शिक्षक संख्या (स्तरनिहाय) :-

| | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|
| १) प्राथमिक : | | | |
| २) माध्यमिक : | | | |
| ३) उच्च माध्यमिक : | | | |
| ४) इतर शाखा : | | | |

८. शिक्षकेतर कर्मचारी संख्या (स्तरनिहाय) :-

| | | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) प्राथमिक | : | | | |
| २) माध्यमिक | : | | | |
| ३) उच्च माध्यमिक | : | | | |
| ४) इतर शाखा | : | | | |

९. एस.एस.सी. परीक्षा निकाल :-

(मागील ०३ वर्षाचा)

| अ. क्र. | वर्ष | विभागीय मंडळाचा निकाल (%) | संस्थेचा निकाल (%) | |
|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण | शहरी |
| १. | २००८-०९ | | | |
| २. | २००९-१० | | | |
| ३. | २०१०-११ | | | |

१०. एच.एस.सी. परीक्षा निकाल :-

(मागील ०३ वर्षाचा)

| अ.क्र. | वर्ष | विभागीय मंडळाचा निकाल (%) | संस्थेचा निकाल (%) | |
|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण | शहरी |
| १. | २००८-०९ | | | |
| २. | २००९-१० | | | |
| ३. | २०१०-११ | | | |

११. संगणक सुविधायुक्त शाळांची संख्या :-

शाळांची संख्या

संगणकांची संख्या

संगणक प्रशिक्षित शिक्षक संख्या

१२. अल्पसंख्याक दर्जा आहे काय? :-

प्रमाणपत्र तपासावे, सत्यप्रत जोडावी.

१३. संस्थेच्या आदिवासी, डोंगराळ, दुर्गम भागातील शाळांची संख्या :-
एकूण विद्यार्थी मुले ----- मुली ------ एकूण ------

१४. जाती, धर्माचा पुरस्कार करीत नसल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडले आहे काय? (तपासणे व सत्यप्रत जोडावी.) :-

१५. प्रवेशाच्या वेळी देणगी घेण्यात येते काय? :-

१६. व्यवस्थापनाच्या गैरव्यवहार व गैरवर्तणूक तक्रारी आहेत काय? :-

१७. व्यवस्थापनाच्या न्यायालयात/धर्मादाय आयुक्त यांचेकडे तक्रार अर्ज आहेत काय? :-

१८. मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल सादर केले आहेत काय? :-

१९. मागील तीन वर्षातील शून्य टक्के निकालाच्या शाळांची संख्या :-

२०. मागील तीन वर्षात मान्यता काढलेल्या शाळांची संख्या :-

२१. मालकीच्या इमारती असलेल्या :-

शाळांची संख्या :- ---------------------

एकूण वर्ग खोल्यांची संख्या :- ---------------------

२२. यापूर्वी राज्य पुरस्कार मिळाला आहे काय? :- ---------------------

इतर पुरस्कार प्राप्त झाले काय? ---------------------

तपशील द्यावा.

२३. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी घेण्यात येत अलेले उपक्रम व लाभार्थी संख्या उपक्रमनिहाय. :-

१. ---------------------------------

२. ---------------------------------

३. ---------------------------------

२४. शैक्षणिक उपक्रमाबरोबर इतर सामाजिक :- १) ------------------------------------
तसेच क्रीडा, कला, संगीत इ. बाबत २) ------------------------------------

उपक्रम व त्याचे लाभार्थी संख्या उपक्रमनिहाय. ३) ------------------------------------

२५. संस्थेने प्रचलित नियमानुसार आरक्षण :-
पूर्णपणे भरलेले आहे काय?
(संस्था प्रमाणपत्र जोडावे.)

२६. सर्वसाधारण अभिप्राय :-

संस्थेचे सचिव
नांव, सही व शिक्का

दिनांक :- / /२०

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
सही, नांव व शिक्का

# भाग - २

## संस्था मुख्यालयाच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी द्यावयाचे अभिप्राय

(संस्थेने सादर केलेल्या माहितीनुसार स्वयंस्पष्ट व वस्तुनिष्ठ अभिप्राय द्यावेत.)

# भाग - ३

## विभागीय निवड समितीचे अभिप्राय

समिती सदस्यांची नांवे व स्वाक्षरी

१)

२)

३)

४)

५)

६)